<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(दुपार )

जा.क्र.३५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०४/२०१७

<u>१) युवतीला मारहान करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—</u>

दिनांक ०५/०४/२०१७ चे १९.१५ वा. दरम्यान यातिल फिर्यादी ही लाखनी येथुन मेंढा पोहरा येथे सायकलने आपले घरी जात असतांना यातील अनोळखी इसमाने तिचे सायकल समोर मोटार सायकल उभी केली व तिला जाण्यास प्रतीबंध केला तसेच आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर थापड मारुन हाताला ओढतांन केली त्यामुळे जखमी झाली व विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४,३४१,३२३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

<u>२) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—</u>

दिनांक ०५/०४/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घराचे समोरील रुम मध्ये हजर असतांनी यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तुझा मुलगा जयपाल हा सध्या कुठे आहे असे छपरीत येवुन विचारले व शिवीगाळ करुन बंडीचे उभारीने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. सरस्वता शिवाजी येळणे वय ६० वर्ष, रा. सामेवाडा तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

<u>३) सौर उर्जेची बॅटरीची चोरी . :—</u>

दिनांक ०५+०६/०४/२०१७ चे रात्र. दरम्यान यातील ग्राम पंचायत कार्यालय एमआडीसी राजेगाव कडुन लावण्यात आलेली एक सौर उर्जेची बॅटरी लुमीनस कंपनीची किंमती ५,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची चोरुन नेल्याने फिर्यादी सोना हरीचंद्र चोपकर वय ३४ वर्ष, रा. लाखनी ग्राम पंचायत कार्यालय एमआयडीसी राजेगाव यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे. पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

<u>४) खिश्यातुन नगदी पैश्याची चोरी . :—</u>

दिनांक ०६/०४/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे मोटार सायकल वर मागे बसुन जात असतांना फिर्यादीचे खिश्यातुन नगदी ५,०००/—रु. काढुन चोरुन घेवुन गेल्याने फिर्यादी खुशाल श्रीराम सेलोकर वय ५९ वर्ष ,रा. माटोरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. गोपाले पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

५) दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने साहित्या सह मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०६/०४/२०१७ चे १९.३० ते २०१५ वा. दरम्यान यातील आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आले त्यांच्या पासुन एक लाल रंगाची बजाज पल्सर क्र. एमएच ३१ बिएफ १७१५ किंमती ३०,०००/–रु, १ लोखंडी रॉड किंमती १००/–रु. १ धारदार तिक्ष्ण सुरा किंमती १००/–रु. असा एकुण ३०,२००/–रु. चा माल घरफोडी करण्याचे हत्यार व घातक शस्त्र मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. काळे स्थागुशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२२(क) मपोका सहकलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

६) नदीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु. :–

दिनांक ०६/०४/२०१७ चे १०.०० वा. दर यातील मृतक केशवराव बकाराम मोरे वय ३५ वर्ष, रा. मांडवी हा नदीचे पात्रात पाण्यात आंघोळ करण्या करीता गेला असता पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी सखाराम मारोती मोरे वय ५५ वर्ष, रा. मांडवी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहे.

७) विषारी औषध करुन पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यु. :–

दिनांक ०५/०४/२०१७ चे १२.०५ वा. दर यातील मृतक रमनबाबु पंढरीजी वालदे वय ५१ रा. केशव नगर खात रोड भंडारा याने विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याने प्राप्त माहिती नुसार केलेला घटनास्थळ पंचनामा फिर्यादी धनराज सावजी कोचे वय ६२ वर्ष, रा. सेवा निवृत्त सहाय्यक फौजदार रा. रजनीनगर खात रोड भंडारा यांचे लेखी आदेशाने वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०६/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १५३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.